# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 23 April 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक २३ एप्रिल २०२६ दुपारी १.०० वा.

****

पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये संभाव्य वाढीची शक्यता वर्तवणाऱ्या बातम्यांचं पेट्रोलियम मंत्रालयानं खंडन केलं आहे. अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नसल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. गेल्या चार वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये वाढ न झालेला भारत हा एकमेव देश असल्याचं मंत्रालयानं अधोरेखित केलं आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतींमध्ये होणाऱ्या दरवाढीचा नागरिकांना फटका बसू नये, यासाठी सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी महत्त्वपूर्ण पावलं उचलली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

चौथी भारत-आफ्रिका शिखर परिषद २८ मे पासून नवी दिल्ली इथं सुरू होणार आहे. सध्या जग जटिल भू-राजकीय आव्हानांचा सामना करत असताना भारत-आफ्रिका भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असं या परिषदेबद्दल माहिती देताना परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी सांगितलं. डॉ. एस. जयशंकर यांनी आज परिषदेचं बोधचिन्ह, संकल्पना आणि संकेतस्थळाचं अनावरण केलं. भारताच्या परराष्ट्र धोरणात आफ्रिकेला अग्रस्थान देण्यात आलं असून, भारत हा आफ्रिकेचा प्रमुख व्यापारी भागीदार आणि मोठा गुंतवणूकदार असल्याचे त्यांनी नमूद केलं. ही परिषद ३१ मे पर्यंत चालणार असून ती आफ्रिकेसोबतचे संबंध अधिक दृढ करण्याच्या भारताच्या दीर्घकालीन वचनबद्धतेचं प्रतीक आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ १० वीच्या परीक्षेचा दुसरा टप्पा १५ मे २०२६ पासून आयोजित करणार असून ही परीक्षा पूर्णपणे ऐच्छिक आहे. ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या टप्प्यात मिळालेल्या गुणांमध्ये सुधारणा करायची आहे, त्यांच्यासाठी ही संधी असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थी विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्र आणि भाषा यांपैकी कोणत्याही तीन विषयांत आपला निकाल सुधारण्यासाठी ही परीक्षा देऊ शकतात. बोर्डाने १० वीच्या पहिल्या मुख्य परीक्षेचे निकाल १५ एप्रिल रोजी जाहीर केले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार घेतलेला हा निर्णय विद्यार्थ्यांना एकाच शैक्षणिक वर्षात दुसरी संधी देऊन त्यांच्यावरील परीक्षेचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे.

****

राहुरी आणि बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. राहुरीत सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पूर्णांक २२ टक्के मतदान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. बारामती विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीकरिता सकाळी ११ वाजेपर्यंत २० पूर्णांक ५९ टक्के मतदान झालं.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात १५२ जागांवर आणि तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांवर मतदान होत आहे. तामिळनाडूमध्ये आतापर्यंत ३७ पूर्णांक ५६ टक्के तर पश्चिम बंगालमध्ये ४१ पूर्णांक ११ टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे.

****

हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते बळीराम पाटील कोटकर यांचं आज पहाटे ३ वाजता वृद्धापकाळानं निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. पोलीस पाटील त्यानंतर सरपंच म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली. दांडग्या जनसंपर्काच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच जनतेच्या मनात स्थान निर्माण केलं होतं, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यातल्या खामगाव इथल्या कोल्हटकर स्मारक परिसरात काल दिवंगत गायिका आशा भोसले यांना सर्व स्तरातून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी परिसरातली कलावंतांनी गीतांच्या माध्यमातून आशा भोसले यांनी अभिवादन केलं. संस्कार भारती, विदर्भ साहित्य संघ शाखा खामगाव आणि टिळक स्मारक महिला मंडळ खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

****

हवामान

नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यात आज आणि उद्या वादळी वारे आणि पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. काल वर्धा इथं सर्वाधिक ४४ पूर्णांक २ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यात ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दरम्यान, जालना जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झालं असून, नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी जिल्ह्यातल्या ५५ शासकीय रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष सज्ज करण्यात आले आहेत.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज संघादरम्यान सामना खेळवण्यात येणार आहे. मुंबईत वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. दरम्यान, काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघानं लखनऊ सुपर जायंटस संघाचा ४० धावांनी पराभव केला. गुणतालिकेत पंजाबचा संघ अव्वल स्थानावर आहे. त्यानंतर राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु संघ अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

****